ब) सदस्य - क्रियाशील सभासदांमधून दोन तज्ञ व्यक्ती ज्या अर्थशास्त्र /सहकार/ बँकींग या विषयामधील तज्ञ आहेत. अकौंटन्सी व ऑडीट, वकील या क्षेत्रातील व्यावसायीक अनुभव असलेल्या व्यक्ती.
सदर समितीची सभा महिन्यातून किमान एकदा होईल.

सदर समितीचे कर्तव्य म्हणजे त्यांच्यासमोर आलेल्या वादामध्ये बँकेस योग्य तो सल्ला देण्याबरोबरच कायदा/नियम, बँकेचे उपविधी व रिझर्व्ह बँकेचे आणि सहकार खात्याचे आदेश व मार्गदर्शक तत्वे तसेच बँकींग आणि सहकार क्षेत्रातील रुढी यांचा विचार करुन सभासद व संस्था यांचेमध्ये तडजोड घडवून आणणे.

**५१) मुख्य कार्यकारी अधिकारी, त्यांचे अधिकार व त्यांची कर्तव्ये :**

रिझर्व्ह बँक व सहकार खाते यांनी वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या फिट ॲण्ड प्रॉपर क्रायटेरियानुसार संचालक मंडळ मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची नेमणूक करेल. तो बँकेचा पूर्ण वेळ सेवक असून

संचालक मंडळास त्यांच्या कामकाजात वेळोवेळी मदत करेल. मुख्य कार्यकारी अधिकारी हा संचालक मंडळाचा पदसिध्द सभासद राहील. मुख्य कार्यकारी अधिकारी हा संचालक मंडळाच्या नियंत्रणाखाली राहील. तसेच संचालक मंडळाच्या मार्गदर्शनानुसार तो आपले पुढील अधिकार व कर्तव्य पार पाडेल.

१) बँकेच्या दैनंदिन व्यवस्थापनावर लक्ष ठेवणे.

२) बँकेच्यावतीने बँकेची खाती चालविणे तसेच रोखतेसाठी सेफ डिपॉझीट लॉकर्सची सुविधा उपलब्ध करणे.

३) बँकेच्यावतीने आवश्यक त्या सर्व कागदपत्रावर सह्या करणे. कायदेशीर कारवाईत बँकेचे प्रतिनिधीत्व करणे.

४) बँकेच्या वतीने आवश्यक ती सर्व हिशेबाची पुस्तके ठेवणे. आवश्यक ते सर्व रेकॉर्ड तयार ठेवणे, कायदा, नियम आणि उपविधीनुसार आवश्यक त्या ठिकाणी विहीत नमुन्यातील विवरण पत्रके दाखल करणे यासंबधींची सर्व योजना करणे.

५) अध्यक्षांच्या सुचनेनुसार सर्वसाधारण सभा, संचालक मंडळ सभा बोलावणे, कार्यकारी समिती आणि उपसमित्यांच्या सभा बोलविणे आणि सदर सभांचे इतिवृत्त तयार करणे.

६) संचालक मंडळाच्या संमतीने बँकेतील विविध जागांकरीता नेमणूका करणे.

७) बँकेची उद्दीष्ट्ये, विविध धोरणे तसेच भविष्य काळासंबधी नियोजन करण्याकरीता संचालक मंडळास मदत करणे.

८) संचालक मंडळास वेळोवेळी आवश्यक ती माहिती देणे तसेच बँकेच्या कामकाजविषयी रिझर्व्ह बँकेने दिलेल्या कॅलेंडर ऑफ रिव्हिव्ह प्रमाणे वेळोवेळी माहिती देणे व रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक निरिक्षणांसंबधी माहिती देणे.